## प्रेसनोट दि.२५/०९/२०१७

## लोन देण्याच्या बहाण्याने फसवणुक करणाऱ्या आरोपीस सायबर क्राईम सेल पुणे शहर यांनी दिल्लीतुन केली अटक

नऱ्हे पुणे येथे राहणाऱ्या एका नोकरदार महिलेस सुमारे ४ महिन्यापुर्वी मो.नं.९८९१००४०७५ या वरुन रिलायन्स सर्व्हीसेस नावाने लोन देतो असा फोन आला होता. त्यावेळी पिडीत महिलेस व ती काम करीत असलेल्या प्रायव्हेट लिमीटेड कंपनीच्या महिला ओनर यांना कर्जाची आवश्यकता असल्याने दोघींनीही लोन पाहिजे असे संबंधीत इसमास कळविले. त्यानंतर त्याच्या सांगण्यावरुन दोन्ही पिडीत महिलांनी त्यांचे कागदपत्रे ८ वा. मजला नारायण मंदीर, बाराखंबा रोड, दिल्ली या पत्त्यावर पोस्टाने पाठविले. काही दिवसांनी दोन्ही पिडीत महिलांना त्यांच्या ईमेलवर लोन पास झाल्याचा मेल आला. त्यानंतर फोनव्दारे त्यांना प्रोसेसिंग फी भरण्यासाठी सांगिण्यात आले. त्याप्रमाणे दोन्ही पिडीत महिलांनी एन.ई.एफ.टी. व्दारे पैसे भरले. परंतु कर्ज मंजुर न झाल्याने पिडीत महिलांना परत संबंधीतांना फोन केला. त्यावेळी तुमचे लोन पास झाले आहेत परंतु ते ट्रान्सफर करण्यासाठी पैसे भरावे लागतील असे सांगण्यात आले. तेव्हा दोन्ही पिडीत महिलांनी पुन्हा पैसे भरले. असे एकुण १,४१,०७४/- रुपये भरल्यानंतरही कर्ज मंजुर न झाल्याने दोन्ही पिडीत महिलांनी रिलायन्स कॅपीटल कंपनीच्या सेनापती बापट रोडवरील कार्यालयात जावुन चौकशी केली असता त्यांची बोगस कंपनीधारकांनी फसवणुक केल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर त्यांनी सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा येथे तक्रारी अर्ज दिला. त्यावरुन अलंकार पोलीस स्टेशन गु.र.नं. १४८/२०१७ भा.दं.वि.क. ४१९,४२०,३४ आय.टी. ॲक्ट ६६(सी), ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबर क्राईम सेलकडुन सदर गुन्ह्याचा समांतर तपास करण्यात येत होता. त्यानुसार आरोपीने वापरलेले मोबाईल नंबर, ईमेल इत्यादींचे विश्लेषन करण्यात आले. त्यातुन आरोपी दिल्लीत असल्याबाबत निष्पन्न झाल्याने सौ. राधिका सु. फडके, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर क्राईम सेल, यांच्या नेतृत्वाखाली एक पथक दिल्ली येथे असताना सदर पथकाने बिल्डींग नं.६०, ब्लॉक-४१, दुसरा मजला, साऊथ पटेलनगर नवी दिल्ली येथील फ्रॉड कॉल सेंटरवर धाड मारली असता सदर ठिकाणी गुन्ह्या करण्यासाठी वापरण्यात आलेले ५ मोबाईल, ४ सिमकार्ड, ८ वॉकी सेट व ७८,०००/- रुपये रोख इत्यादी मुद्देमाल मिळुन आल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच कॉलसेंटर चालविणारा अजितकुमार महेंद्रसिंग कुशवाह वय-३० वर्ष रा. २६०५/४, शादीपुर मेन बाजार, गल्ली नं.४ , पटेलनगर, नवी दिल्ली यास अटक करण्यात आली. त्याच्याकडे अधिक तपास करता मुख्य आरोपी जबलपुर मध्य प्रदेश येथील राहणारा असुन त्याने बी.एस्सी. पर्यन्त शिक्षण घेतले आहे. दिल्ली येथे नोकरीसाठी आला होता. आरोपीने यापुर्वी युनिकॉर्न इन्व्हेस्टमेन्ट सोल्युशन या कंपनीमध्ये काम करीत होता. सदरची कंपनी बंद झाल्यानंतर लवकर पैसे कमविण्यासाठी आरोपीने स्वतःचे फ्रॉड कॉलसेंटर सुरु केले. त्यामध्ये आरोपीने बऱ्याच लोकांची फसवणुक केली आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, मा. सपोआ श्री. मिलींद पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. राधिका फडके, पो.उप-निरी नितीन खामगळ व कर्मचारी दिपक भोसले, राजकुमार जाबा, अमित औचरे, योगेश वाव्हळ, प्रसाद पोतदार, पुजा डाहाळे, संतोष जाधव, राजु भिसे, दिपक माने यांनी केली.

याव्दारे नागरींकाना अवाहन करण्यात येते की, मोबाईल नंबर ९८९१००४०७५, ७०५३७०२०३३, ९१३६०८२२२८ या नंबरवरुन तसेच relince.01finance@gmail.com या वरुन फसवणुक झाली असल्यास तात्काळ सायबर क्राईम सेल, पुणे शहर यांच्याशी संपर्क करावा. तसेच लोनबाबत शक्यतो मान्यताप्राप्त संस्था यांच्या कार्यालयात जावुनच आर्थिक व्यवहार करावेत.